नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक २०/०४/२०२६ (सोमवार )

---

## अवैधरित्या ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळणाऱ्या ०८ आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद
## १ चारचाकी आणि ४ दुचाकी वाहन, ०२ मोबाईलसह एकुण ७ लाख ४६ हजार ९०० रूपयांचा मुद्देमाल जप्त, भिवापुर पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन भिवापूर** :— दिनांक १९/०४/२०२६ रोजी भिवापूर पोलीसांना गुप्त बातमीदारा मार्फत खात्रीशीर माहीती मिळाली की, खैरगाव शिवारात कॅनलच्या बाजुला काही इसम ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळत आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे भिवापूर पोलीस घटनास्थळी पोहचले असता, नमुद घटनास्थळी काही इसम ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळताना दिसुन आले. पोलीसांनी **आरोपी नामे १) अनवीर जयसिंह पवार, वय ३७ वर्ष, राहणार गरडापार, तालुका भिवापूर, जिल्हा नागपूर २) अहमद अक्रम खॉ पठाण, वय ५५ वर्ष, राहणार कारगाव, तालुका भिवापूर, जिल्हा नागपूर ३) वैभव भाऊराव देवतळे, वय २७ वर्ष, राहणार टाका, तालुका भिवापूर, जिल्हा नागपूर ४) सुरज सुधाकर वराडे, वय २६ वर्ष, राहणार वाकेश्वर, तालुका भिवापूर, जिल्हा नागपूर ५) सुजित सुधाकर भोसले, वय ४० वर्ष, राहणार भिवापूर, तालुका भिवापूर, जिल्हा नागपूर ६) प्रफुल संजय गावंडे, वय ३० वर्ष, राहणार वाकेश्वर, तालुका भिवापूर, जिल्हा नागपूर** यांना जागीच पकडले. दोन आरोपी घटनास्थळावरून पळुन गेले. पोलीसांनी घटनास्थळावरून ५२ तासपत्ते आणि ०२ ॲडरॉइड मोबाईल किंमती २०,०००/—रूपये, स्कार्पिओ वाहन क्रमांक एम एच ४०/ए जे ५१४३ किंमती ५,००,०००/— रुपये, विविध कंपन्यांचे एकुण ०४ मोटरसायकल किंमती

२,२०,०००/—रूपये, रोख रक्कम ६९००/—रूपये असा एकुण ७,४६,९००/— रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

**नमुद आरोपीतांविरूद्ध पोलीस स्टेशन भिवापूर येथे कलम १२ महाराष्ट्र जुगार अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.**




**कारवाई करणारे पोलीस पथक जप्त मुद्देमालासह**

# अवैधरित्या ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळणाऱ्या ०९ आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद

# २ दुचाकी वाहन आाणि ६ मोबाईलसंह एकुण २ लाख ७० हजार ७९० रूपयांचा मुद्देमाल जप्त. नरखेड पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन नरखेड** :— दिनांक १९/०४/२०२६ रोजी नरखेड पोलीसांना गुप्त बातमीदारा मार्फत खात्रीशीर माहीती मिळाली की, खाटीकपुरा नरखेड परिसरात काही इसम ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळत आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे नरखेड पोलीस घटनास्थळी पोहचले असता, नमुद घटनास्थळी काही इसम ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळताना दिसुन आले. पोलीसांनी **आरोपी नामे १) धनराज लक्ष्मण घाटोळे, वय ४३ वर्ष, रा. वार्ड क्र. १२, नरखेड, २) दिलीप प्रतापराव ठाकरे, वय ५८ वर्ष, रा. गुरनुले ले आऊट, नरखेड ३) असलम मेहमुद शाह, वय ३० वर्ष, रा. ईस्लामपूरा नरखेड ४) शंकर तुलसीदास अरखेल, वय ५७ वर्ष, रा. सुदर्शन नगर, नरखेघ. झाडीपूरा नरखेड ५) जबी जफरउल्ला खॉ पठाण, वय ३६ वर्ष, रा. ईस्लामपुरा नरखेड ६) कमलाकर नत्थुजी घोरमाडे, वय ५८ वर्ष, रा. झाडीपूरा नरखेड ७) किसना गणपत बन्सोड, वय ५३ वर्ष, रा. कुंभारपूरा नरखेड ८) आसिफखॉ जकीउल्लाखॉ पठाण, वय २८ वर्ष, रा. इस्लामपुरा नरखेड ९) विनोद संतोषराव तागडे, वय ४७ वर्ष,रा. खाटीकपुरा नरखेड** यांना जागीच पकडले. पोलीसांनी घटनास्थळावरून ५२ तासपत्ते, ६५ तासपत्ते किटबॉक्स किंमती २१,४५०/—रूपये,विविध कंपन्यांचे एकुण ०६ ॲडरॉइड मोबाईल किंमती ६२,०००/—रूपये, विविध कंपन्यांचे एकुण ०२ मोटरसायकल किंमती १,७०,०००/—रूपये, रोख रक्कम १६,०९०/—रूपये व इतर साहित्य असा एकुण २,७०,७९०/— रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

**नमुद आरोपीतांविरूद्ध पोलीस स्टेशन नरखेड येथे कलम १२ महाराष्ट्र जुगार अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.**




**कारवाई करणारे पोलीस पथक जप्त मुद्देमालासह**

## उघडया विहीरमध्ये पडुन अपघात किंवा अपप्रकार होवु नये यासाठी काटोल पोलीसांनी तातडीने केल्या उपाययोजना

पोलीस स्टेशन काटोल हद्दीतील थाटुरवाडा या गावातील मुख्य रस्त्याच्या कडेला आणि जमिनीच्या पातळीला एक खुली आणि धोकादायक विहीर असल्याचे काटोल पोलीसांच्या निदर्शनास येताच काटोल पोलीसांनी सदर बाब गांभीर्याने घेत संबंधित मालकाशी संपर्क साधला असता, त्यांनी सदर जमीन पाटबंधारे विभागाकडून अधिग्रहित झाल्याची माहिती दिली. पोलीसांनी पाटबंधारे विभागाशी आवश्यक सुरक्षा उपाययोजना करण्याबाबत पत्रव्यवहार केला आहे. काटोल पोलीसांनी नागरिकांच्या सुरक्षेला प्राधान्य देत कोणताही विलंब न करता स्थानिक ग्रामपंचायत व पोलीस यांच्या संयुक्त प्रयत्नांतून सदर उघड्या विहिरीभोवती संरक्षणात्मक कंपाउंड उभारले आहे.

सदर उपाययोजनेमुळे संभाव्य अपघातांना आळा बसणार असून परिसरातील नागरिकांची सुरक्षा सुनिश्चित करण्यात आली आहे.



## अवैधरीत्या विनापरवाना देशी दारूची वाहतूक करणाऱ्या आरोपीविरूद्ध गुन्हा नोंद, कोंढाळी पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन कोंढाळी** :— दिनांक १९/०४/२०२६ रोजी कोंढाळी पोलीसांना गुप्त बामीदारा द्वारे खात्रीशीर माहीती मिळाली की, मोटरसायकलने अवैधरीत्या देशी दारूची वाहतुक केली जात आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीसांनी पुसागोंदी येथे नाकाबंदी केली असता मोटरसायकल क्र. एम एच ४०/डी ए ६८२२ ही मिळुन आली. वाहन थांबवुन वाहनाची पंचासमक्ष पाहणी केली असता त्यात देशी दारू मिळुन आली. **आरोपी नामे सुनिल किसन चव्हाण, वय २८ वर्ष, रा. पुसागोंदी** हा अवैधरीत्या देशी दारूची वाहतुक करतांना मिळुन आला. पोलीसांनी पंचासमक्ष १) ५० देशी दारूच्या निपा किंमती २,०००/— रूपये आणि मोटरसायकल क्र. एम एच— ४०/डी ए ६८२२ किंमती ५५,०००/—रूपये असा एकुण किंमती ५७,०००/—रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. **नमुद आरोपीविरूद्ध महाराष्ट्र दारूबंदी अधिनियमान्वये गुन्हा दाखल केला आहे.**




**कारवाई करणारे पोलीस पथक जप्त मुद्देमालासह**

## अवैधरित्या विनापरवाना दारू काढणारे, दारू बाळगुण विक्री, वाहतुक तसेच सेवन करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध ११ गुन्हे नोंद

नागपुर ग्रामीण जिल्हयात दिनांक १९/०४/२०२६ रोजी दारूबंदी कायदा अंतर्गत विविध पोलीस स्टेशनला पोलीसांनी अवैधरित्या दारू बाळगुन विक्री करणाऱ्यांवर छापा टाकुन **मोहाफुल दारू, देशी दारू तसेच दुचाकी वाहन असा एकुण ६०,९००/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला.** महाराष्ट्र दारूबंदी अधिनियमान्वये एकुण ११ गुन्हे दाखल करण्यात आले आहे.

**पोलीस स्टेशन बेला** येथे आरोपी नामे निलेश धनराज वानखेडे, वय ३६ वर्ष, रा. सोनेगाव लोधी, जि. नागपूर याचे वर १ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन वडोदा** येथे आरोपी नामे भाउराव भागो कुंभले, वय ५८ वर्ष, रा. भुगाव, ता. कामठी, जि. नागपूर याचे वर १ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन मौदा** येथे आरोपी नामे कैलास दयाराम बन्सोड, वय ४४ वर्ष, रा.

बोरगाव पुल, महादुला शिवार, ता. मौदा याचेवर ०१ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन रामटेक** येथे आरोपी नामे सचिन सुरेश कठौते, रा. नगरधन याचेवर १ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन केळवद** येथे आरोपी नामे सुरेश पुरण आके, वय ३२ वर्ष, रा. खापा नरसाळा याचेवर १ गुन्हा नोंद आहे. **पोलीस स्टेशन सावनेर** येथे आरोपी नामे करण संतोष उईके, वय २२ वर्ष, रा. वार्ड क्र. १, उमरेड, ता. परासिया, जि. छिंदवाडा, ह. मु. खानगाव, ता. सावनेर याचेवर १ गुन्हा नोंद आहे. **पोलीस स्टेशन कळमेश्वर** येथे आरोपी नामे प्रफुल प्रकाशराव हिवसे, वय ४२ वर्ष, रा. येरला, जि. नागपूर याचेवर १ गुन्हा नोंद आहे. **पोलीस स्टेशन कोंढाळी** येथे १) महिला आरोपी २) संगम रमनजी भिंगारे, वय २७ वर्ष, रा. कचारीसावंगा ३) सुनिल किसन चव्हान, वय २८ वर्ष, रा. पुसागोंदी याचेवर प्रत्येकी १ असे ०३ गुन्हे नोंद आहे. **पोलीस स्टेशन काटोल** येथे आरोपी नामे अजय रामलालजी भारके, वय ४० वर्ष, रा. रेल्वे स्टेशन काटोल याचेवर १ गुन्हा नोंद आहे. अशा ११ आरोपीतांवर महाराष्ट्र दारूबंदी अधिनियमान्वये ११ गुन्हे दाखल केले आहे.

**नमुद कारवाईत एकुण १) १५ लिटर मोहाफुल गावठी दारू २) ९९०० मिली देशी दारू असा एकुण ६०,९००/— रूपयांचा मुद्देमाल मिळून आल्याने नाशवंत मुद्देमाल मौक्यावर पंचनामा कार्यवाही करून नष्ट करण्यात आला.**

**मा. पोलीस अधिक्षक**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**
**यांच्या मान्यतेने**